५/७

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
कामगार विभाग,२रा मजला,
प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.
संदर्भ क्र. कामगार/अ/३४३७३
दिनांक : २-१२-२००४

## परिपत्रक

विषय : कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत.
संदर्भ : १) मु.का.परिपत्रक क्र. कामगार/अ/२२६९८ दि. ३०.०७.२००४.
२) मु.का.परिपत्रक क्र. कामगार/अ/३०९९६ दि. २६.१०.२००४.

*************

माननीय कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि.२४.०९.२००४च्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कंत्राटी कामगारांचे वेतन पुनर्निर्धारणाबाबत अंमलबजावणी संबंधिच्या दि.३०.०६.२००४ च्या अधिसूचनेस पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत स्थगित करण्यात आली होती व त्याबाबतच्या सूचना मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. कामगार/अ/३०९९६ दि.२६.१०.२००४ अन्वये निर्गमित केल्या होत्या.

आता सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांनी दि.०९.११.२००४ रोजीच्या पत्रानुसार कळविल्याप्रमाणे मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेली स्थगिती केवळ त्या याचिकेतील अर्जदारांकरिताच लागू आहे. परंतु महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कंत्राटदार सदर याचिकेत याचिकाकर्ता नसल्यामुळे अवशिष्ट उद्योगाच्या दि.३०.०६.२००४ च्या महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेला सदरहू स्थगनादेश लागू नाही. त्यामुळे मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. कामगार/अ/३०९९६ दि. २६.१०.२००४ हे रद्द समजण्यात यावे व तत्पूर्वी मुख्य कार्यालयाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र. कामगार/अ/२२६९८ दि. ३०.०७.२००४ ह्या पुढे ही लागू राहील. याची सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी नोंद घेऊन अमंलबजावणी करावी, ही विनंती.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत :

१) सर्व क्षेत्रिय अधिकारी / कार्यकारी अभियंतापर्यंत व भांडार अधिकारी
२) उप मुख्य औ.सं.अधिकारी/औद्योगिक संबंध अधिकारी/कल्याण अधिकारी/कामगार अधिकारी

D:\Meena\kam A\kantri kam\kantrai paritrak.doc 2

C.E.MAY KINDLY SEE